महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २३ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०६२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे



## सायबर फसवणुक करणारी टोळी भिवंडी पोलिसांच्या जाळ्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी ( प्रतिनिधी ) गरीब गरजूं लोकांच्या बँक खात्यांचा वापर करून सायबर गुन्हे करणाऱ्या आंतर राज्यीय टोळीचा भिवंडी पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शांतीनगर पोलिसांनी मोठ्या शिताफीने तपास करीत पर्दाफाश करीत 7 जणांना दक्षिण गोवा वास्को येथून ताब्यात घेत एकूण 10 जणांना अटक केली आहे.

याबाबत पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी विशेष पत्रकार परिषद घेत माहिती दिली. भिवंडी शहरातील अरबाज शेख या पिडीत तरुणास नोकरी देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट बँकेत खाते उघडण्यास सांगितले.

त्यानंतर नोकरी न लागल्याने त्याने बँकेत जाऊन चौकशी केली असता त्याच्या बँक खात्यात सायबर गुन्ह्यातील पैसे वर्ग केल्याने बँक खाते गोठवल्याचे समजल्याने त्यामुळे त्याने तातडीने शांतीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.या प्रकरणी पोलिसांनी राम गुप्ता, अली मोमिन, नावेद शेख यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.त्यामुळे

पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड, पोलिस उपनिरीक्षक सचिन कुचेकर, पोलिस दीपक सानप, रोहित इंगळे यांच्या पोलीस पथकाने तपास सुरू केला असताना या टोळीचे म्होरके दक्षिण गोवा येथे असल्याचे समजल्यावर या पोलीस पथकाने वास्को येथील सुप्रिम हॉटेल मध्ये कारवाई करीत तेथून आनंद आशोक मेघवानी.(वय ३४ वर्षे, रा. नरसिंगपुर, मध्य प्रदेश)भोला प्रदिप यादव, (वय २१ वर्षे, रा.कटोरीया, जिल्हा बाका, राज्य बिहार, )लालचंद सुनिल मुखीया (, वय २५ वर्षे, रा.अलीनगर, जि. दरभंगा), बिहार, गौरव भुवनेश्वर यादव, वय २५ वर्षे, रा.कटोरीया, जि.बाका, बिहार), रोहितकुमार प्रमोद यादव, (वय २१ वर्षे, रा. बेरीसाल, जि.बाका), बिहार, राजाकुमार चक्रधर यादव, (वय २१ वर्षे, रा.तरगच्छा, जि. बाका, ) बिहार, सौरभ अशोक शर्मा, (वय ४० वर्षे, रा.बसंतपुर, छत्तीसगड ) यांना शिताफीने ताब्यात घेऊन अटक केली आहे.त्यांच्या जवळून ऑनलाईन फसवणुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन लॅपटॉप, ३० मोबाईल फोन व ११ इतर खातेदारांचे साधना सहकारी बँक ली. नागपुर येथील बँक खात्याचे पासबुक, एटीएम कार्ड प्रत्येक पासबुक सोबत एक मोबाईल सिमकार्ड असा एकुण 5 लाख 10 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**गरीब पीडित युवकांना नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून राम गुप्ता,अली मोमिन,नावेद शेख हे त्यांचे महत्वाचे कागदपत्र ताब्यात घेऊन त्या माध्यमातून महाराष्ट्र बँक भिवंडी येथे बँक खाते उघडून बँकेचे पासबुक, एटीएम कार्ड, सिमकार्ड घेऊन त्यामाध्यमातून फसवणुकिच्या उद्देशाने एजंट मार्फत गोवा राज्यात सायबर गुन्हेगार यांचेकडे पाठवले होते.त्यामाध्यमातून अनेकांची फसवणूक केली जात होती.त्यामध्ये लोकांच्या बँक खात्यावर सायबर फसवणुकिचे व गेमिंगचे पैसे वळवून घेत असत.अशा प्रकारे प्रत्येक 15 दिवसांनी आरोपी ठिकाण बदलून सायबर गुन्हे करून वास्तव्य करत असत.**

**नोकरीचे आमिष दाखवून त्यासाठी बँक खाते उघडण्यासाठी कोणी कागदपत्र मागत असल्यास कोणीही कागदपत्र न देता आपली फसवणूक टाळणे गरजेचे आहे असे मत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी व्यक्त केले आहे.अशी फसवणूक कोणाची झाल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिस उपआयुक्त शशिकांत बोराटे यांनी केले आहे.**

## ऑनलाइन गेमिंग' विरोधी विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ऑनलाइन मनी गेमिंगवर बंदी घालणाऱ्या विधेयकाला संसदेने मंजुरी ल्यानंतर आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही मंजुरी दिली आहे. यानंतर आता त्याचे कायद्यात रूपांतर झाले आहे. या कायद्याअंतर्गत, सर्व ऑनलाइन मनी गेमिंग सर्विसवर बंदी घातली जाईल आणि असे गेम उपलब्ध करणाऱ्यांना तीन वर्षापर्यंत तुरुंगवास आणि तब्बल एक कोटी रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होणार आहे. ऑनलाइन गेमिंग प्रमोशन अँड रेग्युलेशन बिल २०२५ यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेने मंजूर केले होते. राज्यसभेने हे विधेयक २६ मिनिटांत आणि लोकसभेने सात मिनिटांत मंजूर केले होते. आता राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर तयार झालेल्या या नवीन कायद्यात ऑनलाइन मनी गेमिंग प्लॅटफॉर्मची जाहिरात केल्यास दोन वर्षांपर्यंत शिक्षा आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. ऑनलाइन गेमिंग प्रमोशन अँड रेग्युलेशन बिल २०२५ यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेने मंजूर केले होते. राज्यसभेने हे विधेयक २६ मिनिटांत आणि लोकसभेने सात मिनिटांत मंजूर केले होते. आता राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर तयार झालेल्या या नवीन कायद्यात ऑनलाइन मनी गेमिंग प्लॅटफॉर्मची जाहिरात केल्यास दोन वर्षांपर्यंत शिक्षा आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

## भिवंडी - वाडा मार्गावर टोल लावा ; पण खड्डे बुजवा !

# या खड्ड्याना आम्ही कंटाळलो

### वाड्यातील संतप्त वाहन चालक, प्रवाशांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण - नरेंद्र पाटील**

राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व लोकप्रतिनिधी यांनी भिवंडी वाडा रस्त्याची पाहणी करून लागलीच या रस्त्यावर टोल सुरू करावा अशी संतप्त मागणी वाहन मालक चालक व प्रवासी यांच्याकडून होताना दिसत आहे. गेल्या तीन ते चार वर्षापासून भिवंडी महामार्ग हा अतिशय धोकादायक बनला असून या मार्गाची दुरुस्ती होण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांसहित अनेक संघटनांनी निदर्शने केली होती तरीसुद्धा या रस्त्याचे काम अजूनही पूर्ण होताना दिसत नाही या रस्त्यामुळे डॉक्टर,वाहन दुरुस्ती करणारे गॅरेजवाले स्पेअरपार्ट वाले यांचा धंदा अतिशय तेजीत आहे मात्र या रस्त्यावरून रोज प्रवास करणारे प्रवासी, वाहन चालक, वाहन मालक, मात्र कमालीचे हैराण झाले आहेत. रोजचा प्रवास करणारा प्रवासी, शालेय विद्यार्थी दुग्ध व्यवसाय करणारे, भाजीपाला विक्रेते, यांच्या मुखातून तर रोजच शिव्यांची लाखोली वाहिली जाते. या रस्त्यावरून प्रवास करताना अनेक अपघातही झालेले आहेत त्या अपघातामध्ये आणि त्यांना आपले प्राण गमवावे लागले आहे तर अनेकांना दुखापती झाल्या आहेत अनेकांची हाडे खिळखिळी झाली आहेत तर अनेक वाहने नादुरुस्त होऊन त्यांना दुरुस्तीसाठी प्रचंड खर्च करावा लागतो आहे तरीसुद्धा या शासनाचे अनेक वर्षापासून दुर्लक्ष होत आहे.

मागील काही महिन्यांपासून या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले परंतु ठेकेदारांना मिळणारा निधी हा वेळेवर मिळत नसल्याने ठेकेदारांनी आपला गाशा गुंडाळून आपल्याकडील यंत्रणाच घेऊन पोबारा केला असल्याचे दिसून येते. म्हणूनच या मार्गावर राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि येथील लोकप्रतिनिधी यांनी एकदा तरी प्रवास करावा म्हणजे गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्यावरून ये- जा करणाऱ्यांची अवस्था कशी असेल हे समजून घेता येईल



अशी संतप्त भावना सर्वसामान्यांमधून उमटत आहे. अनेक पर्यटक दरवर्षी समुद्रकिनारी जाऊन नौका विहार करण्याचा आनंद लुटत असतात परंतु पावसाळ्यात हा आनंद त्यांना लुटता येत नाही त्यामुळे या पर्यटकांनी भिवंडी वाडा रस्त्यावर प्रवास केल्यास होडीत बसल्याचा आनंद त्यांना नक्कीच लुटता येईल अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होताना दिसत आहे तसेच या मार्गावर शासनाने टोल बसविला तर नक्कीच टोलच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात निधी गोळा होईल व तो निधी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वापरता येईल असे अनेक जाणकार नागरिकांचे म्हणणं आहे त्यामुळे लवकरात लवकर शासनाने या मार्गाची तपासणी करून त्यावर टोल आकारावा आणि मिळणाऱ्या टोलच्या पैशात रस्ता दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी चर्चा संतप्त नागरिकांमधून होताना दिसत आहे.

## कल्याण डोंबिवलीचा गड राखण्यासाठी महायुतीत संघर्ष ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर कल्याण डोंबिवली शहरांमधील विविध पक्षांमधील माजी नगरसेवक, पदाधिकारी आपल्या पक्षात दाखल करून घेण्यासाठी शिंदे शिवसेना आणि भाजपमध्ये जोरदार रस्सीखेच आहे. 'ही रस्सीखेच आता होतच राहणार. ठाणे जिल्ह्यात भाजप हा येत्या दिवसात प्रथम क्रमांकाचा पक्ष असेल' अशी विधाने गुरूवारी भाजप नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या पक्षप्रवेशाच्यावेळी केली. त्यामुळे येत्या काही दिवसात या पक्षप्रवेशांवरून भाजप, शिंदे शिवसेनेतील संघर्ष अटळ असल्याची चिन्हे आहेत.

चार प्रभागांचा एक प्रभाग अशी रचना येत्या महापालिका निवडणूक काळात असण्याची शक्यता आहे. या नव्या प्रभाग व्यूहरचनेत आपण कसे वरचढ राहू आणि कोठल्याही प्रभागात तगड्या उमेदवाराची कमी पडता कामा नये यासाठी शिंदे शिवसेना आणि भाजपने कल्याण, डोंबिवलीतील ठाकरे गट, मनसे, काँग्रेसमधील जुने जाणते माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आपल्या पक्षात घेण्याचा सपाटा लावला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने सुरू असलेल्या देश, राज्य, पालिका, ग्रामीण स्तरावरील विकास योजना पाहून इतर पक्षांमधील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते स्वताहून भाजपकडे येत आहेत. अशा कार्यकर्त्यांचे स्वागत केले जात आहे. संघटनात्मक बांधणीसाठी असे निष्ठावान कार्यकर्ते नक्कीच पक्षाची ताकद आहेत

**- नंदू परब, जिल्हाध्यक्ष, कल्याण जिल्हा भाजप.**

अनेक वर्ष कल्याण डोंबिवली पालिकेत शिवसेना भाजप युतीने काम करत आहोत. संख्यात्मक बळ, विकास यामध्ये आम्ही नेहमीच पालिकेत मोठे भाऊ आहोत. आता भाजपलाही आपण मोठे भाऊ व्हावे असे वाटत असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे. विकासाच्या विषयावर आम्ही जनतेच्या मनात आहोत. तोच विषय घेऊन लोकांसमोर जाणार आहोत.

**-राजेश कदम, उपजिल्हाप्रमुखडोंबिवली.**

## राज्यातील महापालिकांच्या प्रभागरचना सोमवारी प्रसिद्ध होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यातील राजकीय पक्षांना आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांना आता निवडणुकांचे वेध लागले असून दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे फटाके फूटणार आहेत. त्यासाठी, राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाचं कामकाज सुरू झालं असून राज्य निवडणूक आयोगाकडून मुंबई महापालिका सह गट अ, ब आणि क वर्गातील महापालिकांच्या प्रभाग रचना 25 ऑगस्टला प्रसिद्ध करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे आणि त्यावर हरकती सूचना मागवणे यासाठी 22 ते 28 ऑगस्टचा वेळ देण्यात आला आहे. मात्र, काही महापालिकांचे प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव हे राज्य निवडणूक आयोगाला महापालिकांकडून उशिरा प्राप्त झाल्याने सोमवारी प्रभाग रचना प्रसिद्ध करणार असल्याची माहिती महापालिकेतील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

प्रभाग रचना प्रसिद्धीनंतर सूचना व हरकतींवर सुनावणी घेऊन प्रभाग रचना अंतिम करण्याचं काम केलं जाईल आणि त्यानंतर प्रभाग रचना आराखडा नगर विकास विभागाला पाठवला जाणार आहे. राज्यातील 29 महानगरपालिकांपैकी 10 महापालिकांच्या प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त झाल्या आहेत. गट ड च्या महापालिकांच्या प्रभाग रचना संबंधित महापालिकांकडून प्राप्त होत असल्याची माहिती आहे. मुंबई,नागपूर,पुणे,ठाणे,नाशिक, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजी नगर,वसई विरार,नवी मुंबई या महापालिकांच्या प्रभाग रचना संबंधित महापालिकांकडून राज्य निवडणूक आयोगांकडे प्राप्त झाल्या आहेत. सोमवारी यातील बहुतांश महापालिका प्रभागरचना प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न राज्य निवडणूक आयोगाकडून केला जाईल. दरम्यान, 'ड' वर्गाच्या महापालिकांच्या प्रभाग रचना या 3 सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहेत आणि त्यानंतर त्यावर हरकती मागवल्या जातील.








# गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन । न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ १८-६७ ॥

हा गीतारूप रहस्यमय उपदेश कधीही तप न करणाऱ्या माणसाला सांगू नये. तसेच भक्तिहीन माणसाला आणि ऐकण्याची इच्छा नसणाऱ्यालाही सांगू नये. त्याचप्रमाणे माझ्यामध्ये दोष पाहणाऱ्याला तर कधीही सांगू नये. ॥ १८-६७ ॥

य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति । भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ १८-६८ ॥

जो पुरुष माझ्या ठिकाणी परम प्रेम ठेवून हे परम रहस्ययुक्त गीताशास्त्र माझ्या भक्तांना सांगेल, तो मलाच प्राप्त होईल, यात मुळीच शंका नाही. ॥ १८-६८ ॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः । भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥ १८-६९ ॥

माझे अत्यंत प्रिय कार्य करणारा त्याच्याहून अधिक मनुष्यांत कोणीही नाही. तसेच पृथ्वीवर त्याच्याहून अधिक मला प्रिय दुसरा कोणी भविष्यकाळी होणारही नाही. ॥ १८-६९ ॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः । ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ १८-७० ॥

जो पुरुष आम्हा दोघांच्या धर्ममय संवादरूप या गीताशास्त्राचे अध्ययन करील, त्याच्याकडूनही मी ज्ञानयज्ञाने पूजित होईन, असे माझे मत आहे. ॥ १८-७० ॥

# पेणमधील गणेशमूर्तीकारांची समन्वय बैठक संपन्न

## मूर्तिकारांच्या दळणवळणात सहकार्याची भूमिका बजावणार - पोलिस महानिरीक्षक संजय दराडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून समजल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील गणेश मूर्तिकारांची समन्वय बैठक पेण पालिकेच्या सभागृहात कोकण परिक्षेत्र पोलिस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. यावेळी गणेशमूर्तीकारांना मार्गदर्शन करताना संजय दराडे यांनी गणेशमूर्तीकरांनी जी मूर्ती ट्रान्सपोर्ट करण्याची समस्या मांडली आहे त्यात पोलिस प्रशासन नक्कीच सहकार्याची भूमिका बजावणार आहे असे सांगितले. यावेळी रायगड पोलिस अधीक्षक आचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित फडतरे, विभागीय पोलिस अधीक्षक जालिंदर नालकुल, पोलिस निरीक्षक संदीप बागुल, पोलिस निरीक्षक प्रसाद पांढरे, पोलिस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे,पेणमधील गणेश मूर्तिकार, शांतता कमिटी सदस्य आणि पेणमधील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



> आम्ही ज्या ट्रान्सपोर्टच्या वेळी येणाऱ्या अडचणी आणि जागेच्या अभावाबाबत समस्या मांडल्यानंतर पोलिस महानिरीक्षकांनी ज्या सूचना दिल्या त्याप्रमाणे आम्हीच सर्व एकत्र येऊन जिल्हा उद्योग केंद्रामार्फत विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रयत्न करणार आहोत आणि पोलिस प्रशासनाने जो कारखानदारांच्या व्यवसायात त्यांच्या पद्धतीने सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली आहे त्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त करतो. - श्रीकांत देवधर, जेष्ठ गणेश मूर्तिकार

अवघ्या चार दिवसावर गणेशोत्सव आला असल्याने आणि पेणमध्ये हजारो गणेशमूर्तिकारांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कोकण परिक्षेत्र पोलिस महानिरीक्षक संजय दराडे पेण येथे आले होते. यावेळी कारखानदारांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर त्यांना मार्गदर्शन करताना बाप्पाच्या मूर्ती पेणममधून इतरत्र दळणवळणाच्या माध्यमातून नेताना आपल्या गाडीला गणपतीची गाडी असल्याचा स्टिकर लावा, जेणेकरून आमच्या कर्मचाऱ्यांना ती गणपतीची गाडी आहे असे समजेल आणि त्यांना सहकार्य करता येईल, त्याचप्रमाणे इतर व्यापाऱ्यांना देखील ट्रान्सपोर्टच्या बाबतीत अडचण होणार नाही यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार असे सांगितले.तसेच 'आपण कारखानदारांनी जी जागेची समस्या मांडली आहे त्याबाबत संबंधित लोकप्रतिनिधी, पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांच्याशी योग्य तो पत्रव्यवहार करा त्यात तुम्हाला निश्चितच यश मिळेल, इतर शहरातील वाहतूक व्यवस्था चोखपणे पार पाडण्यासाठी आमचे पोलिस दल योग्य पद्धतीने जबाबदारी पार पडतील.' असे सांगितले. यापुढे वर्षातून दोन वेळा गणपती कारखानदारांशी संवाद साधला जाईल असे आश्वासीत केले. यावेळी गणपती कारखानदार श्रीकांत देवधर, नितीन मोकल, मयुरेश चाचड, सागर पवार यांसह ॲड मंगेश नेने, संतोष पाटील यांनी गणपती कारखानदारांच्या वतीने विविध समस्या मांडल्या. तर पोलिस प्रशासनाच्या वतीने उपस्थित गणपती कारखानदारांचा सत्कार करण्यात आला.

# गुलाम व्यापार आणि त्याचे निर्मूलन

23 ऑगस्ट हा गुलाम व्यापार आणि त्याच्या निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून युनेस्कोने घोषित केला. या दिवशी, 1791 मध्ये सँटो डोमिंगोमध्ये एक बंडखोरी सुरू झाली ज्याने ट्रान्स-अटलांटिक गुलाम व्यापार नष्ट करण्याचा मार्ग मोकळा केला.

या स्मरणार्थ, गुलामांच्या व्यापाराच्या इतिहासाविषयी जागरुकता पसरवण्याची गरज अधोरेखित करण्याचा युनेस्कोचा उद्देश आहे जेणेकरून लोक आधुनिक जगावर गुलामगिरीचा प्रभाव ओळखू शकतील.

प्राचीन भारतीय समाजात 'गुलाम प्रथा' ही नेमकी नसावी हे आपण ह्यावरुन म्हणू शकतो की ऋग्वेदात दास आणि दासी हे शब्द अनेक वेळा वापरले आहेत आणि ते ही वेळग्या संदर्भात जसे की राक्षसी वर्णाचा शत्रू, पगारी नोकर अशा अनेक अर्थांनी वापरले गेले. धर्मशास्त्राने गुलामाशी मानवीय व्यवहार केले पाहिजे असा लोकांना कळवलं आहे. हे जाणून घेणे आणखीन मनोरंजक आहे की कौटिल्यांच्या अर्थशास्त्रात गुलाम बनवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कठोर शिक्षा आहे.

हिंदू सभ्यतेमध्ये 'दास' त्या व्यक्तीला म्हटलं गेले आहे जो एकतर सेवा - चाकरी करतो किंवा आपल्याशी मोठे कोणी विद्वान संत किंवा व्यक्तिमत्वला आपला आदर्श किंवा गुरु मानतो. ग्रीस, रोम आणि इजिप्त सारख्या समाजांसारथी भारताची स्थिती नव्हती जेथे गुलामांना क्रूरपणे वागवले जात असायचे.

> मानवी शोषण एकदाच आणि कायमचे नाहीसे करण्याची आणि प्रत्येक व्यक्तीची समान आणि बिनशर्त प्रतिष्ठा ओळखण्याची हीच वेळ आहे. आज आपण भूतकाळातील पीडित आणि स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करूया जेणेकरून ते भावी पिढ्यांना न्यायी समाज निर्माण करण्यासाठी प्रेरणा देतील.
> - UNESCO

मेगॅस्थेनिस सांगतात की भारतात गुलाम नव्हते, पण अर्थशास्त्र समकालीन भारतात गुलामगिरीचे अस्तित्व नोंदवते; ओनेसिट्रसच्या अहवालाच्या आधारे स्ट्रॅबोने मेगास्थेनिसच्या दाव्याचाही प्रतिकार केला. इतिहासकार शिरीन मौसावी मानतात की गुलाम बहिष्कृत होते आणि त्यांना समाजाचे सदस्य मानले जात नव्हते. इतिहासकार रोमिला थापर यांच्या मते, भारतीय समाजातील गुलाम आणि इतर यांच्यात तीव्र फरक नसल्यामुळे (ग्रीक समाजाच्या विरूद्ध) मेगॅस्थेनिसला गोंधळात टाकले असावे: भारतीयांनी उत्पादनाचे साधन म्हणून गुलामगिरीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला नाही आणि भारतातील गुलाम परत विकत घेऊ शकतात किंवा त्यांचे स्वातंत्र्य त्यांच्या स्वामींद्वारे जारी करता येतं.

मध्ययुगीन भारतात दासत्व 'गुलाम गिरी' मध्ये परिवर्तित होताना दिसले, कारण होते इस्लामिक आक्रमणे. भारतात इस्लामिक शासन स्थापित होण्यासह गुलाम प्रथा वाढली. युद्धनंतर लोकांना हाथ पाय बांधून ताब्यात घेतले जात असे, त्यांना गुलाम बनवून त्यांच्याशी इतर काम करवली जात होती आणि कोणत्याही आदेशाला नाकारण्यावर त्यांना प्रताडित केले जात असे. तेव्हा गुलामांची विक्री ही एक सामान्य प्रथा होती. गुलामगिरीशी स्वतःला वाचवण्यासाठी असंख्य हिंदू स्त्रियांनी जौहर किंवा सामूहिक आत्महत्या केल्याचे इतिहासात नोंद आहे.

आधुनिक भारतीय इतिहासात गुलामांचा व्यापार मद्रासमध्ये आणि संपूर्ण दक्षिण भारतात पसरलेला होता. नेपाळी तरुण मुलींना भारतात लैंगिक गुलामगिरीत विकले जात असे. एका दृष्ट्या बघितलं तर इंग्रेजांनी तर पूर्ण भारताला गुलाम बनवलं होतं.

गुलाम प्रथा ही भारतीय संस्कृतीची देणगी नव्हती. 'दास ' ही व्यक्ती स्वतःच्या संमतीने असयाचे आणि दासत्व मध्ये देखील नियम धर्म असायचे. जगातले इतर आक्रमणकारी ज्यांनी भारतावर राज केलं त्यांनी आपल्या आपल्या पातळीवर गुलाम प्रथेला प्रोत्साहान दिला. ह्याच्या परिणामस्वरुप आज देखील आपल्या समाजात बंधनकारक मजुरी ह्यांची संख्या आहे. बंधपत्रित मजुरी ही कल्पनाच सनातन धर्माच्या भावनेच्या विरुद्ध आहे ज्यांनी हजारो वर्षांपासून हिंदू संस्कृतीवर शासन केले ह्याला मूळापासून कापून फेकले पाहिजे.

- हर्षिता बारगल

# केडीएमसीच्या वतीने साफ-सफाई मोहिम सुरु

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सततच्या मुसळधार पर्जन्यवृष्टीनंतर सखल भागात ठिकठिकाणी पाणी साचून, रोगराई होण्याचा संभव असतो. या रोगराईचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सर्व प्रभागांच्या सहा. आयुक्तांना आपापल्या प्रभागात सर्वत्र साफ-सफाईची मोहिम राबविणेबाबत तसेच प्रभागात धुरीकरण करणेबाबतचे निर्देश दिले आहेत.



गेले काही दिवस कल्याण-डोंबिवली परिक्षेत्रातही सर्व ठिकाणी अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे विशेष करुन वालधुनी सारख्या सखल भागात तेथील सहा.आयुक्त यांनी आपल्या पथकामार्फत डिप क्लिनींग ड्राईव्ह सुरु केला आहे. महापालिकेच्या इतर प्रभागातही सहा. आयुक्तांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचारी वर्गाच्या मदतीने पावसामुळे झालेला चिखल, वाहून आलेला कचरा व गाळ इ. उचलण्याची व्यवस्था करुन साफ-सफाई करण्यास सुरुवात केली आहे.

तसेच डासांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पुर परिस्थितीच्या घरांमध्ये सखल भागात धूर,जंतुनाशक फवारणी देखील केली जात असल्यामुळे, नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली
# ठाणे येथे जनता दरबाराचे आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि.22 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता राम गणेश गडकरी रंगायतन, तलाव पाळीजवळ, डॉ.मूस मार्ग, ठाणे (पश्चिम) येथे "जनता दरबार" आयोजित करण्यात आला आहे.

दि.22 ऑगस्ट रोजी होणाऱ्या जनता दरबारामध्ये नागरिकांनी आपल्या समस्या मांडून त्या समस्यांचा निपटारा करून घ्यावा, असे मंत्री कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांवर कारवाई करा

## क्रांतिज्योत सामाजिक संघटनेचे वाडा तहसीलदारांना निवेदन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वाडा बस स्टॅन्ड, बस स्टॅन्ड समोरील दुकाने, वाडा मार्केट, वाड्यातील इतर सार्वजनिक ठिकाणे, कुडूस बस स्टॅन्ड, कुडूस बाजार मार्केट, आणि कडूस मधील इतर सार्वजनिक ठिकाणे इत्यादी ठिकाणी मागील अनेक वर्षापासून सर्रासपणे दारू पिऊन थांबणे, फिल्मी स्टाईलने सिगारेट ओढणे, मुली, महिला असताना असभ्य वर्तन, शेरेबाजी करणे हे प्रकार सातत्याने दिसून येत आहेत. ह्यावर प्रतिबंध घालावा यासाठी क्रांतिज्योत सामाजिक संघटनेकडून आज वाडा तहसीलदार, वाडा पोलीस निरीक्षक आणि वाडा नगरपंचायत मुख्याधिकारी ह्यांना निवेदन देण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी सिगारेट ओढणे ह्याचा गंभीर परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होत आहे. सर्व ठिकाणे सार्वजनिक असल्याने मुली, महिला, नागरिक, शालेय विद्यार्थी ह्यांना त्याचा प्रचंड त्रास होतो. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी असताना हे प्रकार सर्रासपणे पाहायला मिळतात. तरी ह्यावर प्रतिबंध घालावा अशी मागणी संघटनेच्या वतीने केली गेली. ह्यावेळी संघटनेचे अध्यक्ष कल्पेश ठाणगे, उपाध्यक्षा मृणाली नडगे, माजी उपशिक्षणाधिकारी कृष्णा जाधव, ॲड. नितेश म्हसे यांसह विद्यार्थी हजर होते.



## आरोग्य
# व्यायामामुळे हृदय करे निरोगी राहते?

**कोलेस्टेरॉल नियंत्रित करते:** व्यायामामुळे चांगले कोलेस्टेरॉल (HDL) वाढते आणि वाईट कोलेस्टेरॉल (LDL) कमी होते.

**रक्तदाब स्थिर ठेवतो:** नियमित व्यायामामुळे रक्तवाहिन्यांमध्ये लवचिकता राखली जाते आणि उच्च रक्तदाबाचा धोका कमी होतो.

**वजन नियंत्रित करते:** लठ्ठपणा हे रक्तपेशींमध्ये अडथळा निर्माण होण्याचे सर्वात मोठे कारण आहे. व्यायामामुळे वजन संतुलित राहते. ताण कमी होतो: योग, प्राणायाम आणि ध्यान हृदय शांत ठेवते आणि तणावामुळे होणाऱ्या हृदयाच्या समस्या कमी करते.

**रक्ताभिसरण सुधारते:** व्यायामामुळे हृदय अधिक प्रभावीपणे रक्त पंप करते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा येण्याची शक्यता कमी होते.

**हृदयातील ब्लॉकेज टाळण्यासाठी कोणता व्यायाम करावा?**

**जलद चालणे:** दिवसातून किमान ३० मिनिटे जलद चालणे हा हृदय निरोगी ठेवण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे.

**योग आणि प्राणायाम:** अनुलोम-विलोम, भस्त्रिका आणि कपालभाती सारखे प्राणायाम ऑक्सिजन पुरवठा वाढवतात आणि हृदय मजबूत करतात.

**सायकल चालवणे आणि पोहणे:** हे एरोबिक व्यायाम हृदयाच्या स्नायूंना बळकटी देतात आणि अडथळा टाळतात.

**हलके वजन प्रशिक्षण:** हलके वजन प्रशिक्षण चयापचय वाढवते आणि कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करते.

**ताणणे आणि ध्यान:** हे शरीर लवचिक बनवते आणि हृदयावरील ताण आणि दबाव कमी करते.

# कल्याणमध्ये पुन्हा सुरु होणार मीटर रिक्षा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अनेक वर्षापासून कल्याणमध्ये मीटर रिक्षा व्हावी अशी नागरिकांची मागणी होती. ती येत्या आठवड्यात पूर्ण होणार आहे. लवकरच कल्याण मध्ये पुन्हा एकदा मीटर रिक्षा सुरू होणार आहेत. मीटर रिक्षांमुळे रिक्षाचालक व प्रवाशी यांच्यातील सततचे वाद मिटणार आहे. त्याच बरोबर रिक्षा चालकांच्या मनमानी भाडे वाढीला चाप बसणार आहे. रिक्षाचालक व प्रवाशी यांच्यातील तंटे थांबण्यास मदत होणार आहे. कल्याण मध्ये मीटर रिक्षेचा प्रश्न अनेक वर्ष प्रलंबित होता. कारण मीटर रिक्षा चालू करण्यासाठी रिक्षा चालकांचा विरोध होता. पण आता मीटर रिक्षा चालू झाल्यामुळे प्रवाशांना इच्छित स्थळी जाण्यासाठी योग्य दरात रिक्षा सुविधा उपलब्ध झाल्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. येत्या आठवड्याभरात कल्याण स्टेशनवरील एक मार्गिका ही मीटर रिक्षांसाठी आरक्षित केली जाणार असून या पार्श्वभूमीवर रिक्षा युनियन, रेल्वे व्यवस्थापक, आरटीओ अधिकाऱ्यांनी आज पाहणी केली. रिक्षा युनियनचे अध्यक्ष प्रणव पेणकर, रेल्वे स्टेशन मास्तर आर. मीना, आर टी ओ अधिकारी प्रशांत देवरे यांच्यासह जीआरपी आरपीएफच्या अधिकाऱ्यांनी आज स्टेशन परिसरात पाहणी केली. आणि पुढील आठवड्याभरात मीटर रिक्षांसाठी स्टेशन परिसरातील एक मार्गिका आरक्षित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याची माहिती रिक्षा युनियनचे नेते प्रणव पेणकर यांनी यावेळी दिली.

# कांदा विकला तरी भाव नाही चाळीत ठेवला तरी पैसा नाही

## जुन्नर तालुक्यातील शेतकरी हतबल; कांद्याला योग्य भाव देण्याची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : दरवर्षी एखाद्या ना एखाद्या संकटाने शेतकरी हैराण होतो. कधी नैसर्गिक आपत्ती, तर कधी भाव नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडते. यंदा कांद्याला अपेक्षित भाव न मिळाल्याने जुन्नर तालुक्यातील शेतकरी हतबल झाले आहेत.

सध्या शेतकऱ्यांना कांद्याला फक्त १३ ते १६ रुपये प्रतिकिलो दर मिळत आहे. वास्तविक ३५ ते ४० रुपयांचा भाव अपेक्षित असताना, निम्म्याहून कमी दरात कांदा विकण्याची वेळ आल्याने शेतकरी संतप्त आहेत. अवकाळी पावसामुळे उत्पादन घटले, तरीही अधिक भावाच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कांदा चाळीत साठवून ठेवला होता. परंतु गेल्या दोन-चार महिन्यांपासून कांद्याचे दर निचांकी पातळीवर गेल्याने शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे.



दरम्यान, अनेक शेतकऱ्यांनी पुढील हंगामासाठी कर्ज घेतले आहे. मात्र भाव कमी मिळाल्याने कर्जावरील व्याज, चाळीचे भाडे आणि उत्पादन खर्च यामुळे ते दुहेरी संकटात सापडले आहेत. "कांदा विकायचा तरी भाव नाही, आणि चाळीत ठेवला तरी पैसा नाही," अशी हतबल भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

**शेतकऱ्यांचा प्रश्न**

"देशी-विदेशी दारूचे दर सरकार ६० ते १०० रुपयांनी वाढवते, मग शेतकऱ्यांच्या कष्टाने पिकवलेल्या कांद्याचे दर का वाढवले जात नाहीत? सरकार दारू उत्पादक कंपन्यांना मोठा टॅक्स मिळतो म्हणून त्यांचाच विचार करते का?" असा सवाल कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

**शेतकऱ्यांची मागणी:**

सरकारने शेतकऱ्यांच्या कष्टाचा विचार करून कांद्याला योग्य भाव द्यावा, शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढावे, अशी मागणी जुन्नर तालुक्यातील शेतकरी करत आहेत.



# आजचे राशि भविष्य

**मेष**

तुमच्या व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**

देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे.पाहुण्यांच्या येण्यामुळे घरात आनंदी वातावरण असेल.

**मिथुन**

तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील. आज तुमचे आरोग्य चांगले राहील.कोणतीही खास गोष्ट शेअर करू नका.

**कर्क**

तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल. कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे.

**सिंह**

घरात काही महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल. आज तुमच्या योजना आणि उपक्रम गुप्त ठेवा.

**कन्या**

सर्व मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल. रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. आज जोडीदार आणि कुटुंबातील सदस्यांचे पूर्ण सहकार्य मिळेल.

**तूळ**

कधी कधी अति स्वकेंद्रित असण्याने आणि अहंकाराची भावना असल्यामुळे परस्पर संबंधांमध्ये काही तणाव निर्माण होतो. आरोग्य चांगले राहील.

**वृश्चिक**

कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या. ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल.

**धनु**

अनुभवी लोकांचे सहकार्य आणि मार्गदर्शन तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**मकर**

परस्पर संबंध सौहार्दपूर्ण राहतील. सर्व मेहनत आणि शक्ती कामात वाहून घ्याल. आजच्या कार्यात तुमच्या योगदानामुळे तुमचा आदर देखील वाढेल.

**कुंभ**

आईच्या सल्ल्याने विचारपूर्वक घेतलेला कोणताही निर्णय नजीकच्या भविष्यात फायदेशीर ठरेल.तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल.

**मीन**

सकारात्मक राहण्यासाठी, चांगले साहित्यिक आणि कुटुंबातील सदस्यांच्या संपर्कात राहिल्यास चांगले होईल. आज तुमचे लक्ष नवीन कामावर असेल.






# ६ फूटांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे - आयुक्त सौरभ राव

## गणेशमूर्ती विसर्जनासाठी ठाणे महापालिकेने विसर्जन व्यवस्थेत वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सहा फुटांपर्यंतच्या सर्व गणेश मूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावात करण्यात येणार आहे. तर, सहा फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्ती नैसर्गिक जलस्रोतात विसर्जित करता येणार आहे. त्यामुळे कृत्रिम तलाव व फिरत्या विसर्जन व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. गेल्यावर्षी पेक्षा दीड पट जास्तीची विसर्जन व्यवस्था केली असून हरित विसर्जन ॲपही ठाणे महापालिकेने तयार केले असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

राज्य उत्सवाचा दर्जा मिळालेला गणेशोत्सव यंदाही दरवर्षीच्याच उत्साहाने साजरा करूया. नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेऊन गणपती बाप्पाच्या आशिवार्दाने उत्सव निर्विघ्नपणे साजरा करूया, असे आवाहनही आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

यावर्षी 23 कृत्रिम तलाव, 77 टाकी विसर्जन व्यवस्था, 15फिरती विसर्जन केंद्र, 09 खाडी घाट विसर्जन व्यवस्था आणि 10 मूर्ती स्वीकृती केंद्र अशा एकूण 134 ठिकाणी विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. खाडी घाट येथे फक्त 06 फूटाच्या वरील गणेशमूर्त्यांचे विसर्जन केले जाईल असेही आयुक्तांनी नमूद केले.

### अतिरिक्त विसर्जन व्यवस्था

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गणेशमुर्ती विसर्जनाकरिता कृत्रिम तलाव व टाकी विसर्जन व्यवस्था करण्यात आली असून, त्याची यादी खालील प्रमाणे आहे.

1. उथळसर प्रभाग समिती – टाकी विसर्जन व्यवस्था - रुस्तमजी – 1, रुस्तमजी – 2 (अटायलर बिल्डींग), परुळेकर मैदान- सिध्देश्वर टाकी, ऋतुपार्क शितल डेअरी समोर, परमार्थ निकेतन समोर, मुख्यालयाजवळ, स्वातंत्र सावरकर मैदान, परमार्थ निकेतन कृत्रिम तलाव- आंबेघोसाळे, रुणवाल नगर येथे ठा.म.पा. चे जागेमध्ये (अतिरिक्त) व्यवस्था करण्यात आली आहे.
2. नौपाडा प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - रहेजा संकुल, कशिश पार्क, सदगुरु गार्डन-कोपरी, बारा बंगला-कोपरी, प्र.क्र. 20 मध्ये राऊत स्कुल जवळ, प्र.क्र. 21 मध्ये भक्ती मंदिर, प्र.क्र. 22 मध्ये गणेश टॉकीज कृत्रिम तलाव- मासुंदा दत्त घाट, कोपरी कृत्रिम तलाव अष्टविनायक चौक जवळ व्यवस्था करण्यात आली आहे.
3. कळवा प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - 90 Feet रोड कळवा, सह्याद्री शाळा, सायबा क्रीडा नगरी मनिषा नगर, खारेगाव नाका पोलीस चौकीमागील मैदान, कळवा पूर्व, विटावा-कर विभाग कार्यालय, कळवा-गावदेवी मैदान निसर्ग उद्यान परिसर कळवा (3) कृत्रिम तलाव- खारीगांव कृत्रिम तलाव, घोलाई नगर कळवा(पू), न्यु शिवाजी नगर कळवा तलाव, रेल्वे विसर्जन घाटाजवळ विटावा परिसरात विसर्जन करता येईल
4. दिवा प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - पडले BSUP दिवा, माय सिटी-दिवा प्रभाग समिती, रिव्हरवुड कॉम्पलेक्स, अरिहंत आरोही-कल्याण शिळ रोड, दिवा महोत्सव मैदान-दिवा शिळ रोड, मुक्ता हाईट्स, निर्मल नगरी, सुदामा रिजेन्सी-खर्डी, ए. एन. डी. कॉम्प्लेक्स-आगासन कृत्रिम तलाव- दातिवली तलाव, खिडकाळी तलाव, पडले गाव येथील सरस्वती शाळेजवळ विसर्जन करता येईल.
5. मुंब्रा प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - शंकर मंदिर तलाव, बाबाजी पाटील वाडी विसर्जन घाट, आनंद कोळीवाडा घाट, राणानगर घाट, रेतीबंदर घाट कृत्रिम तलाव- शंकर मंदिर तलाव विसर्जन घाटाजवळ.
6. माजिवडा प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - स्प्रिंग हिल सोसायटी-वाघबीळ ते सरस्वती स्कूल रस्ता, विजयनगरी ॲनेक्स, लोढा लक्झरीया- माजिवडा, अर्बन पार्क गार्डन, हायलॅण्ड मैदान, बाळकुम साकेत घाट, दोस्ती काऊंटी बाळकुम, लोढा स्प्लेंडोरा, लोढा अमारा, वाघबीळ घाट कृत्रिम तलाव- निलकंठ वुडस-टिकुजीनी वाडी कृत्रिम तलाव, रेवाळे कृत्रिम तलाव, बोरीवडे गाव येथील कृत्रिमतलाव, ब्रम्हांड ऋतुपार्क, कृत्रिम तलाव, हिरानंदानी, न्यू हॉरीझॉन जवळील TMC मैदान, कोलशेत विसर्जन महाघाट, गायमुख विसर्जन महाघाट, बाळकुम कशेळी विसर्जन घाट
7. लोकमान्यनगर प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - लोकमान्य नगर बस स्टॉप, लक्ष्मी पार्क फेज 1-सिध्दिविनायक उद्यान परिसर, आचार्य आत्रे मार्ग- कोरस नक्षत्र संकुल परिसर, दोस्ती विहार संकुल परिसर, पु. ल. देशपांडे मार्ग-रुणवाल प्लाझा परिसर, लोकमान्य नगर बस स्टॉप, दोस्ती विहार संकुल परिसर
8. वागळे प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - रस्ता क्र. 22-नेप्चुन एलिमेंन्ट कंपनीजवळ, रस्ता क्र. 22-पासपोर्ट ऑफीसजवळ, पाण्याच्या टाकीजवळ- श्रीनगर, अय्यप्पा मंदिरासमोर, श्रीनगर (2 टँक), हिंदूस्तान हॉटेलजवळ-अंबिका नगर, रस्ता क्र. 22-नेप्चुन कंपनी जवळ, रस्ता क्र. 22-पासपोर्ट ऑफिस जवळ, आय आय टी सर्कल जवळ (2 टँक), रोड नं.27 हॅप्पी मॅन जवळ (1 टँक), रतनबाई कंपाऊंड कृत्रिम तलाव- रायलीदेवी कृत्रिम तलाव-1, रायलादेवी कृत्रिम तलाव-2
9. वर्तकनगर प्रभाग समिती - टाकी विसर्जन व्यवस्था - वसंत विहार क्लब हाऊस, समता नगर वेलफेअर सेंटर, पवार नगर बस स्टॉपजवळ, स्वामी विवेकानंदनगर (म्हाडा वसाहत), सिध्दांचल संकुल-इलाईट गार्डनजवळ, समतानगर तारांगण, हाईड पार्क संकुल, उन्नती गार्डन, देवदर्शन डोंगरीपाडा कृत्रिम तलाव- उपवन तलाव परिसर विसर्जन व्यवस्था वर्तकनगर नाका स्वागत कक्ष, देवदयानगर स्वागत कक्ष

दोन सत्रात स्वतंत्र मनुष्यबळ

विसर्जनाच्या ठिकाणी दोन सत्रात मनुष्यबळाची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच घाट विसर्जनस्थळी क्रेन आणि वाढीव बार्ज ठेवण्यात येणार आहेत. तरी गणेशभक्तांनी विसर्जनस्थळी नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे तसेच विसर्जनस्थळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे असेही आयुक्तांनी नमूद केले.

### हरित विसर्जन ॲप

हरित विसर्जन ॲपमुळे नागरीकांना त्यांच्या नजीक परिसरात कुठे विसर्जन व्यवस्था आहे, याची माहिती मिळणार आहे. तसेच ठामपाने फिरत्या विसर्जन व्यवस्थेबाबत तयार केलेले मार्गही दिले जाणार आहे. तरी नागरिकांनी हरित विसर्जन ॲपवर नोंदणी करावी व शासनाचे अनुपालन करण्यास सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. https://ecovisrjan.com/ ही ॲपची लिंक व QR Code खालील प्रमाणे आहे.

# 'महाज्योती'च्या स्पर्धा परीक्षेच्या ऑनलाईन प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) आणि विशेष मागास (एसबीसी) प्रवर्गातील पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी, याकरिता परीक्षेच्या पूर्व तयारीकरिता महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येते. 2025-26 सत्रासाठी 'महाज्योती' यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्मचारी निवड आयोग (एसएससी-सीजीएल), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस), इन्स्टिट्यूशन ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शनच्या (आयबीपीएस) प्रोबेशनरी ऑफिसर (पीओ) आणि भारतीय जीवन बीमा निगम (एलआयसी) तर्फे असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर (एएओ) या पदासाठी 28 जुलै 2025 पासून अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली.

इच्छुक विद्यार्थ्यांना www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर 20 ऑगस्ट 2025 पर्यंत अर्जाची शेवटचा दिनांक असताना राज्यभरातून विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. तसेच विद्यार्थ्यांनी 'महाज्योती'च्या हेल्प लाईन नंबरवर फोन करून या सर्व परीक्षांच्या अर्जाची मुदतवाढ करण्यासंदर्भात विनंती केली होती. विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अर्जाची अंतिम मुदत आता 31 ऑगस्ट 2025 पर्यंत वाढविण्यात आली आहे. या उपक्रमामुळे अनेक गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळून त्यांच्या यशाची शक्यता अधिक बळकट होईल, असा विश्वास इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी व्यक्त केला आहे, अशी माहिती 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी दिली आहे.

राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण ऑनलाईन प्रशिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल 'महाज्योती'तर्फे उचलले आहे. या योजनेंतर्गत टॅबलेट, 6 GB डेटा प्रतिदिन, नियमित चाचण्या, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, वैयक्तिक सल्ला व अभ्यास साहित्य अशा अनेक सुविधा विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेमार्फत पुरविण्यात येणार आहे. प्रशिक्षणाबाबतचे सर्व तपशील, निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज करण्याची सविस्तर प्रक्रिया याबाबतची माहिती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. परिक्षेची तयारी करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहनही इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले आहे.

### ऑनलाईन अर्ज करताना कागदपत्रांबाबत दक्षता बाळगा: मिलिंद नारिंगे

'महाज्योती'च्या संकेतस्थळावर सूचना फलक (नोटीस बोर्ड) या पर्यायात जाऊन एसएससी-सीजीएल, एमईएस, आयबीपीएस-(पीओ) आणि एलआयसी (एएओ)-2025-26 ला भेट द्यायची आहे. यानंतर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार. तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे स्वाक्षांकित करुन स्पष्ट दिसतील, असे स्कॅन करुन अपलोड करावे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच विद्यार्थ्यांचा अर्ज हा स्वीकृत होणार. तसेच पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी परीक्षा घेऊन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार, अशी माहिती सुद्धा व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी सांगितले. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना आधार कार्ड, जातीचा प्रमाणपत्र, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, 12 वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र, पदव्युत्तर उत्तीर्ण गुणपत्रक किंवा पदव्युत्तरच्या शेवटचा वर्षाचे प्रमाणपत्र आणि दिव्यांग असल्यास 40 टक्के पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला असेही 'महाज्योती'तर्फे कळविण्यात आले आहे.प्रशिक्षणाबाबतचे सर्व तपशील, निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज करण्याची सविस्तर प्रक्रिया याबाबतची माहिती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरचे प्रशिक्षण हे नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत देण्यात येणार असून प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड ही प्रवेश परीक्षा घेऊन करण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या गुणांकाच्या आधारे मेरीटच्या आधारे निकषांनुसार अंतिम निवड करण्यात येणार आहे. 'महाज्योती'च्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात येत्या 31 ऑगस्ट 2025 पर्यंत ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. तसेच अधिक माहितीसाठी 0712-2870120/121 या क्रमांकावर संपर्क करावे.

## जीवनदीप महाविद्यालय खर्डी येथे

# जागतिक लोकसाहित्य दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथे मराठी विभागाच्या वतीने जागतिक लोकसाहित्य दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता आभासी माध्यमातून करण्यात आले. "तमाशा : एक लोककला प्रकार" या विषयावर प्रा. महेश थोरात (मराठी विभाग, मॉर्डन महाविद्यालय, डोंबिवली) यांनी मार्गदर्शन केले.

त्यांनी तमाशा या पारंपरिक लोककलाप्रकाराचा इतिहास, सामाजिक संदर्भ, स्त्री-पुरुष कलाकारांचे योगदान, तसेच आजच्या काळातील तमाश्याचे बदलते स्वरूप यांचा वेध घेतला. लोककला ही जनमानसाशी निगडित असल्याने तिचे संवर्धन आणि अभ्यास महत्त्वाचा असल्याचे प्रा. महेश थोरात यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. कैलास कळकटे (प्र.प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी) यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी तमाशा ही केवळ करमणुकीची कला नसून जनजागृतीचे प्रभावी साधन असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्तावना प्रा. दिप्ती मोरे (मराठी विभाग) यांनी केली. उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी व्याख्यानाला मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला.

# अनधिकृत नळ जोडणी करणाऱ्यांवर महापालिकेची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मौजे भिवंडी, केसर बाग ठाणा रोड, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी प्लंबर श्री. शमीम शेख व प्लंबर समीर खान यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेच्या जालवाहिनीला छिद्र पाडून अर्धा इंच व्यासाची १६ नळ अनाधिकृत जोडणी घेतलेली असल्यामुळे महानगरपालिकेच्या पाण्याची चोरी रु. ५६,८००/- (अक्षरी रु.छप्पन्न हजार आठशे रु. मात्र) नुकसान झाले असल्याने त्यांचा विरुद्ध भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३२४(४), ३२६ (क), ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उप अभियंता श्री. सरफराज अंसारी यांचे अधिपत्याखाली विराज भोईर, पथक प्रमुख, नफीस मोमीन, सहाय्यक पथक प्रमुख यांचे मार्फत करण्यात आली.

# ठाणे महापालिकेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे महापालिकेच्या विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना अतिरिक्त आयुक्त २. प्रशांत रोडे, उपमाहिती जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, कार्यालयीन अधीक्षक सुनील परदेशी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर व महापालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी.

# महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या पुढाकाराने पुणे येथे 'पर्यटनाचा महाकुंभा'चे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र हे ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक आणि धार्मिक पर्यटनासाठी देश-विदेशात प्रसिद्ध आहे. सह्याद्रीपासून कोकण किनारपट्टीपर्यंत, विदर्भाच्या वन्यजीवांपासून मराठवाड्याच्या वारशापर्यंत, राज्याची पर्यटन संपदा अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. यामुळेच महाराष्ट्र पर्यटनाला जागतिक पातळीवर अधिक बळकटपणे सादर करण्याची संधी साधत महाराष्ट्र पर्यटन संचालनालय (डायरोक्टरेट ऑफ टुरिझम (DOT)) यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील पर्यटनाचा व्यापक प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने येत्या शनिवार व रविवार दि.23 व 24 ऑगस्ट 2025 रोजी पुणे सेंट्रल हॉल, डेक्कन येथे पर्यटनाचा महाकुंभ 2025 या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून "आपला जिल्हा, आपले पर्यटन" ही थिम आहे. मुख्य प्रायोजक महाराष्ट्र पर्यटन संचालनालय, प्रायोजक रॉयल गोल्डफील्ड कब रिसॉर्ट आणि संकल्पना व ट्रॅव्हल पार्टनर स्मिता हॉलिडेज यांच्या संयुक्त विद्यमानाने हा पर्यटनाचा महाकुंभ आयोजिला आहे. कार्यक्रमाचे ठिकाण सेंट्रल पार्क हॉटेल, जंगली महाराज रोड, डेक्कन पुणे असून वेळ सकाळी 10 ते रात्री 8 पर्यंत आहे. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील सर्व 36 जिल्ह्यांचे पर्यटन स्टॉल्स, ज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख पर्यटनस्थळे, ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक परंपरा आणि विशेष वैशिष्ट्यांचे दर्शन घडणार असून, सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकारांना आमंत्रित करण्यात आले आहे. युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांचा विशेष प्रचार यामध्ये करण्यात येणार आहे.

नागरिकांनी व पर्यटकप्रेमींनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत अधिक संख्येने या कार्यक्रमास हजेरी लावावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

परिशिष्ट — १०

**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

सार्वत्रिक निवडणूक सन - २०२५

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

जाहीर सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या सन-२०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | शुक्रवार, दिनांक २२.०८.२०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे, नागरी सुविधा केंद्र (मुख्यालय) व सर्व संबधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | शुक्रवार, दिनांक २२.०८.२०२५ ते गुरूवार, दिनांक ०४.०९.२०२५ (दुपारी ३.०० वा.पर्यत) |

**टिप :** हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठामपा/पिआरओ/निवडणूक /५६८/२०२५-२६
दि.२२.०८.२०२५
**Please visit our official website**
**www.thanecity.gov.in**

सही/-
(सौरभ राव,भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

# 'राज्य महोत्सव' गणेशोत्सवाकरिता प्रत्येक शासकीय विभागाने सहभागीता वाढवावी – ॲड. आशिष शेलार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. गणेशोत्सवाला "राज्य महोत्सव" घोषित केले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते. आता 'गणेशोत्सव' प्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा. यासाठी प्रत्येक विभागांनी विविध उपक्रमातून आपली सहभागीता वाढवून आपापल्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी उपस्थित सर्व राज्य आणि केंद्र सरकारी अधिकाऱ्यांना दिल्या.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांच्या उपस्थितीत राज्य तसेच केंद्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एमएसआरडीसी महामंडळ, वांद्रे येथे बैठक झाली. या बैठकीस मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई विद्यापीठ, सीमा शुल्क, बेस्ट, एमआयडीसी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचपीसीएल, बीपीसीएल, मध्य व पश्चिम रेल्वे, भारतीय जीवन विमा प्राधिकरण, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर लि., भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अदानी एअरपोर्ट, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य विकास पायाभूत सुविधा महामंडळ, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, महाजनको, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, अदानी पॉवर, टाटा ट्रस्ट, टाटा पॉवर तसेच केंद्र व राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता २२ देशांमध्ये साजरा होतो. सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने आणि आता राज्य शासनामार्फतही साजरा होणारा हा गणेशोत्सव सर्व धर्म, जात, भाषांना जोडणारा उत्सव असावा. या गणेशोत्सव काळात तालुका ते राज्य स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धांसाठी १० कोटी रुपयांची बक्षिसे ठेवली जाणार असून समाजमाध्यमांवरून विशेष मोहीम राबवली जावी. गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक विभागाने नाट्य, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनोस्कोचा दर्जा मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विषय घेऊन कार्यक्रम राबविण्यात यावेत. घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो-व्हिडिओ जगभरातून अपलोड करता यावेत, यासाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यात प्रमुख मंडळांचे थेट प्रक्षेपण सुद्धा उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर चित्रपट महोत्सव, शैक्षणिक कार्यक्रम आदी विषयांवर निबंध, चित्रकला, ब्लॉग स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात आपापल्या विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत "ऑपरेशन सिंदूर"द्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात यावा. तसेच आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना यांचा गौरव करण्यात यावा, असेही निर्देश मंत्री ॲड.शेलार यांनी या बैठकीत दिले.

गणेशोत्सवाला "राज्य महोत्सव" दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीत भर पडली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार असल्याचे मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.




# भिवंडी मनपा कार्यक्षेत्र अंतर्गत क्षयरोगबद्दल चित्रकला स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका कार्यक्षेत्र अंतर्गत दिनांक १४.८.२०२५ रोजी सिराजुल उलुम उर्दू प्राईमरी शाळा, अन्सार मोहल्ला भिवंडी येथे राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम भिवंडी मनपा अंतर्गत डॉक्टर फोर यू तसेच एन.टी.ई.पी. भिवंडी यांच्या विद्यमानाने क्षयरोग बद्दल चित्रकला स्पर्धा प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर तसेच शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद यांच्या मार्गदर्शनाने क्षयरोग बद्दल चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. दिनांक २२.८.२०२५ रोजी शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद यांनी क्षयरोग बद्दल माहिती विद्यार्थीनी यांना दिली तसेच चित्रकला स्पर्धेमध्ये उत्कृष्ठ चित्र काढलेले विद्यार्थीनी यांना पहिला, दुसरा व तिसरा असे ३ टीम यांना बक्षीस देऊन प्रोत्साहित करण्यात आले. या क्षणी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, एन.टी.ई.पी. भिवंडी कर्मचारी, आय.एफ.एम. चे असद काजमी आणि डॉक्टर फोर यू चे कर्मचारी उपस्थित होते.

ठाणे • शनिवार
•२३ ऑगस्ट २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पान ४

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सरसावले राजाभाऊ पातकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मागील तीन ते चार दिवसापासून कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. अनेक सखलभागात पाणी भरल्यामुळे नागरिकांची घरे पाण्याखाली गेली होती. कल्याण पश्चिमेकडील रेतीबंदर परिसरात नागरिकांच्या घरात कमरे इतके पाणी साचल्याने संपूर्ण संसार पाण्याखाली गेला होता. आज पाणी ओसरल्यानंतर नागरिक संसार गोळा करत आहेत. मात्र, अन्नधान्य भिजल्याने खायचे काय? ही चिंता त्यांना सतावत असून, या गरिबांच्या भुकेच्या हाकेला काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी प्रतिसाद दिला आहे. पातकर यांच्यावतीने या परिसरात नागरिकांना अन्नाची पाकिटे वाटली. त्यांचा संसार ताळयावर येईपर्यंत त्यांच्यासाठी अन्नदान करणार असल्याचे पातकर यांनी सांगितले. त्याचबरोबर पूर परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य समस्यांवर मात करण्यासाठी या परिसरात आरोग्य शिबिर भरविणार असल्याचे आश्वासन पातकर यांनी दिले.



# राष्ट्रीय अंतराळ दिवस

आज २३ ऑगस्ट, आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला. या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे.

२३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान - ३ या नावाने ओळखली जाते. याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा



प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती. चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता. या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती. यानातील काही घटक ऐनवेळी कार्यन्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती. सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला. या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली. चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे. या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



दुग्धेन धेनुः कुसुमेन वल्ली शीलेन भार्या कमलेन तोयम्।
गुरुं विना भाति न चैव शिष्यः शमेन विद्या नगरी जनेन।।
ज्याप्रमाणे गाय दूधावीणा अपूर्ण आहे, वेल फुलांशिवाय शोभत नाही, पत्नी चरित्र शिवाय, पाणी कमळाशिवाय, विद्या शांती शिवाय आणि शहर लोकांशिवाय, त्याचप्रमाणे शिष्य हा सदगुरू शिवाय शोभत नाही, अपूर्ण आहे.
गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# महापालिका आयुक्त यांनी व्हीसीद्वारे घेतला रस्ते दुरुस्तीचा आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज VC द्वारे सर्व प्रभागातील अभियंते व ठेकेदार यांची बैठक घेतली आणि कल्याण डोंबिवली परिक्षेत्रात सुरू असलेल्या रस्ते दुरुस्ती आणि खड्डे भरणीच्या कामाचा प्रभाग निहाय आढावा घेतला.

येत्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुढील पाच दिवसात जास्तीत जास्त मशिनरी आणि मनुष्यबळ वापरून रस्ते दुरुस्ती करावी, दिवसभर व रात्री या दोन्ही सत्रात काम करावे तसेच जास्त वाहतुकीचे,वर्दळीच्या ठिकाणी रात्रीचे वेळी काम करावे असे निर्देश त्यांनी सर्व प्रभागातील अभियंते आणि ठेकेदार यांना दिले. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे एखादी आपत्ती घडल्यास संबंधित ठेकेदारास ब्लॅक लिस्ट केले जाईल असाही इशारा त्यांनी या बैठकीचे वेळी दिला.

**कोणाचीही खैर केली जाणार नाही आयुक्त यांचा सक्त इशारा**

# राज्यातील अतिवृष्टीचा विचार करून ओला दुष्काळ जाहीर करा : हर्षवर्धन सपकाळ

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची मदत द्या अशी मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात मागील तीन चार दिवसात मुसळधार पावसाने अनेक भागात पुरस्थिती उद्भवली आहे. या पावसाचे पाणी शेतात शिरून पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, उभी पिके वाहून गेली आहेत. अतिवृष्टीमुळे राज्यातील जवळपास १५ लाख एकर पेक्षा जास्त क्षेत्रावरील शेतपिकांचे प्रचंड मोठे नुकसान झाल्याचे समजते. राज्यातील सध्याची परिस्थिती पाहता ओला दुष्काळ जाहीर करा व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीने मदत द्या, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणतात की, मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील जवळपास १७ जिल्ह्यांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे, उत्तर महाराष्ट्र व कोकणातही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ज्वारी, बाजरी, उडीद, मका, सोयाबिन, मूग, कापूस, तूर, फळे व भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे, हजारो हेक्टरवरील ऊसालाही मोठा फटका बसला आहे, काही ठिकाणी शेतकऱ्याचे पशूधन वाहून गेले आहे तर नांदेड जिल्ह्यात जिवीतहानीही झाली आहे. आधीच संकटाचा सामना करत असलेल्या बळीराजाला निसर्गाने आणखी संकटात टाकले आहे.



राज्य सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले असले तरी सरकारने या कठीण प्रसंगी सर्व नियम, अटी व शर्थी बाजूला ठेवून शेतकऱ्यांची मदत केली पाहिजे. जेथे जिवीतहानी झाली आहे त्यांच्या कुटुंबियांचा सहानुभूतीपूर्ण विचार करून मदत करावी अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# यंदा उल्हासनगरात डिजे मुक्त गणेशोत्सव

## पालिका प्रशासन, पोलिस आणि गणेशोत्सव मंडळांचा सामाजिक निर्धार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गणेशोत्सव २०२५ चे स्वागत शांततेत, भक्तीभावाने आणि कायद्याच्या चौकटीत व्हावे, यासाठी उल्हासनगरात प्रशासन, पोलिस आणि गणेश मंडळांची भव्य संयुक्त बैठक पार पडली. टाऊन हॉलमध्ये झालेल्या या बैठकीत ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, शासन नियमावली आणि सुरक्षा उपाययोजनांची सविस्तर माहिती देत “डॉल्बी-डीजे मुक्त उत्सव” साजरा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. शेकडो मंडळ प्रतिनिधी व अधिकारी उपस्थित राहिलेल्या या बैठकीत उत्सवासाठी आवश्यक समन्वय साधला गेला असून, यंदाचा गणेशोत्सव सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले.

गणेशोत्सव २०२५ शांततेत, कायदेशीर मर्यादेत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी उल्हासनगर कॅम्प नंबर ३ येथील शहीद जनरल अरुणकुमार वैद्य सभागृहात महापालिका, पोलीस, शासकीय यंत्रणा यांची संयुक्त समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, पोलीस उपायुक्त सचिन गोरे, प्रांत अधिकारी विजयानंद शर्मा, उल्हासनगर तहसीलदार कल्याणी कदम, अंबरनाथ तहसीलदार दत्तात्रय पुरी, सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी, शैलेश काळे




> गणेशोत्सव हा आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. उत्सव मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात साजरा करताना नागरिकांची सोय, स्वच्छता आणि सुरक्षितता याकडे विशेष लक्ष दिले जाईल. प्रशासन सर्व विभागांशी समन्वय साधून ‘डॉल्बी-डीजे मुक्त उत्सव’ यशस्वी करण्यासाठी सज्ज आहे. नियम पाळून साजरा होणारा हा उत्सवच खऱ्या अर्थाने आदर्श ठरेल.
> – मनिषा आव्हाळे ,आयुक्त, उल्हासनगर महापालिका

तसेच परिमंडळ-४ मधील आठही पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ निरीक्षक उपस्थित होते. याशिवाय शांतता कमिटीचे सदस्य व गणेश भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी प्रशासन आणि पोलिसांनी उत्सव काळात नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचा निर्धार केला. तसेच ध्वनीप्रदूषणाच्या मुद्द्यावर विशेष भर देण्यात आला. सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी यांनी लघुपट आणि पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे ध्वनीप्रदूषणाचे दुष्परिणाम मांडले. अतिरेक आवाजामुळे उद्भवणारे आजार, लहान मुलांवर व ज्येष्ठ नागरिकांवर होणारे परिणाम अधोरेखित करण्यात आले. तसेच सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, राज्य शासनाची नियमावली आणि पोलीस महासंचालकांचे परिपत्रक यांची माहिती देऊन 'डॉल्बी-डीजे मुक्त' उत्सवाचे महत्त्व पटवून सांगण्यात आले.

गणेश मंडळांच्या समस्या देखील बैठकीत पुढे आल्या. वीज पुरवठा, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षेसंदर्भातील अडचणींवर महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, वीज वितरण कंपनी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ या विभागांनी तत्काळ मार्गदर्शन केले. त्यामुळे मंडळांना मिळालेला प्रतिसाद सकारात्मक होता. शिस्तबद्ध नियोजन, कायद्याचे पालन आणि समन्वयातून यंदाचा गणेशोत्सव अधिक सुरक्षित, शांततेत आणि भक्तिमय वातावरणात पार पडेल असा विश्वास या बैठकीतून व्यक्त करण्यात आला. प्रशासन-पोलिस-मंडळांचा हा संयुक्त प्रयत्न नागरिकांसाठी उत्सवाला खऱ्या अर्थाने “सुरक्षित आनंदोत्सव” बनवणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> गणेशोत्सव हा आनंदाचा आणि श्रद्धेचा सोहळा आहे. परंतु या उत्सवात कायद्याचे पालन, ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण आणि नागरिकांची सुरक्षितता ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सर्व मंडळांनी प्रशासनाशी समन्वय साधून ‘डॉल्बी-डीजे मुक्त उत्सव’ साजरा करावा, यासाठी पोलिस यंत्रणा पूर्ण तयारीत आहे. नियमांचे पालन झाले तर उत्सव अधिक भव्य, सुरक्षित आणि आनंदमय ठरेल.
> – सचिन गोरे,
> पोलीस उपायुक्त

# सफाळे येथील बुलेट ट्रेन कामासाठी स्फोटामुळे नुकसानग्रस्त ग्रामस्थांना न्याय मिळवून देऊ - आ. विलास तरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सफाळे : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामासाठी सफाळे पश्चिमेस असलेल्या. जलसार, टेंभिखोडावे, विराथन बुद्रुक,मांडे आदी परिसरात सुरू असलेल्या कामामुळे, या ठिकाणी करण्यात येणाऱ्या स्फोटकांच्या वापरामुळे अनेक घरांना तडे पडले असून, यामुळे ग्रामस्थांना प्रचंड आर्थिक नुकसान होत असून ते मानसिक तणावाखाली राहत आहे.

या अनुषंगाने श्री.विलास तरे आमदार बोईसर विधानसभा यांनी जलसार गावाला भेट देऊन प्रत्यक्ष गावातील घरांची पाहणी करीत ग्रामस्थांच्या वेदना जाणून घेतल्या. त्यावेळी श्री. श्याम मदनूकर,- उपविभागीय पोलिस अधिकारी, श्री.रिफन दास- एल अँड टी कंपनी अभियंता - व प्रकल्प व्यवस्थापक, उपलब्ध होते. यावेळी श्री. विलास तरे - आमदार यांनी सांगितले, सर्वसामान्य शेतकरी, कामगार, आदिवासी यांच्या घरांना तडे पडणे, शेतीचे नुकसान होणे किंवा त्यांच्या जीवनावर परिणाम होणे, हे कुठल्याही परिस्थितीत योग्य ठरणार नाही. मी स्वतः जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणेशी तातडीने बैठक घेऊन ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच गावकरी यांचे म्हणणे ऐकून घेऊन, तात्काळ संबंधित अधिकारी यांना सूचना दिल्या व सांगितले, ग्रामस्थांनवर अन्याय होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी पालघर यांच्या उपस्थितीत संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन योग्य ती नुकसान भरपाई, मदत मिळण्यासाठी मी लक्ष ठेवून आहे. बुलेट ट्रेन देशांचा महत्त्वाचा प्रकल्प आहे.तो जलदगतीने पुर्ण होणे आवश्यक आहे. पण तो स्थानिकांचा विश्वास संपादन करून मार्गी लागला पाहिजे असेही विलास तरे आमदार यांनी सांगितले.



गावकऱ्यांनी आमदारांना सांगितले की, यांवर गावकरी यांचे सांगणे आहे की, गेल्या काही महिन्यांपासून बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. या कामात वापरल्या जाणाऱ्या स्फोटकामुळे परिसरातील घरे हादरत असून भिंतींना व पाया भागाला तडे पडत आहेत. आम्हाला विकासाच्या विरोधात जायचे नाही, परंतु आमच्या घरांची, मालमत्तेची हानी होत असेल तर आमच्या न्याय्य मागण्या मान्य करून आम्हाला नुकसानभरपाई द्यावी,” अशी मागणी ग्रामस्थांनी केली. यावर श्री. रिफन दास यांनी सांगितले ग्रामस्थांच्या समस्या संबंधित सगळा अहवाल मी वरिष्ठांना पाठण्याचे आश्वासन देतो.

यावेळी जलसार ग्रामपंचायतीचे सरपंच साक्षी गावड, उप सरपंच विक्रोश म्हात्रे, स्वप्नील केणी, तेजस पाटील, सूरज साळुंखे आदी तसेच पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे लवकरात लवकर नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे सादर करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

बुलेट ट्रेनसारखा देशाचा महत्त्वाचा प्रकल्प जलद गतीने पूर्ण होणे आवश्यक असले तरी स्थानिकांचा विश्वास संपादन करूनच तो मार्गी लागला पाहिजे, असे मत व्यक्त करून आमदार तरे यांनी गावकऱ्यांना दिलासा दिला. यानंतर आमदार आणिअधिकारी यांनी मांडे, विराथन बुद्रुक येथील स्थानिक गावकरी यांच्याशी संपर्क साधला.

# रमेश दळवी यांना २०२५ चा आदर्श सरपंच पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : आंबेले ग्रामपंचायतीचे कर्तव्यदक्ष सरपंच रमेश दळवी यांना संघर्ष पत्रकार संघ ठाणे जिल्हा यांच्या वतीने 2025 चा आदर्श सरपंच पुरस्कार नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते देण्यात आला .आंबेले ग्रामपंचायतीत केंद्र सरकारची दीड कोटीची जलजीवन योजना,गावातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व पेव्हरब्लॉक बसविणे ,अशी अनेक विकासकामे त्यांनी केली आहेत . केलेल्या विकासकामांची दखल घेऊन यंदाचा संघर्ष पत्रकार ठाणे जिल्हा यांनी त्यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर केला होता .15 ऑगस्ट रोजी आयोजित केल्याला भव्य पुरस्कार सोहळयात त्यांचा विशेष सन्मान करून त्यांना नानजीभाई ठक्कर यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला .त्यामुळे त्यांच्यावर तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे .



जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024